RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ८१] मंगळवार, जून ३०, २०२६/आषाढ ९, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २५०**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### जलसंपदा विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ जून, २०२६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि-१५१७/प्र.क्र.२५०/आ(तांत्रिक).— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अभियांत्रिकी सेवेतील **कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), गट-ब (अराजपत्रित)** या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेतः-

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ :-** (१) या नियमांस, जलसंपदा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अभियांत्रिकी सेवेतील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), गट-ब (अराजपत्रित) या पदाचे (सेवाप्रवेश) नियम, २०२६ असे म्हणावे.

(२) हे नियम **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या :-** या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) “नियुक्ती प्राधिकारी” याचा अर्थ, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), गट-ब (अराजपत्रित) या पदावर नियुक्ती करण्यासाठी सक्षम प्राधिकारी असणारे विभागाचे मंत्री, असा आहे;

(ख) “पदवी” याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही विद्या शाखेची पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असल्याचे शासनाने घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता, असा आहे;

(ग) “विभाग” याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग असा आहे;

(घ) "विभागीय परीक्षा" याचा अर्थ, जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता विभागीय परीक्षा (कायम करण्यासाठी) नियम, २०२४ नुसार महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिकद्वारे घेतली जाणारी परीक्षा, असा आहे;

(ङ) "पदविका" याचा अर्थ, मान्यताप्राप्त परिसंस्थेची पदविका, असा आहे;

(च) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

**३.** जलसंपदा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अभियांत्रिकी सेवेतील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), गट-ब (अराजपत्रित) या पदावरील नियुक्ती, पुढील निकष पूर्ण करणाऱ्या व त्यासाठी घेतलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :-

**(१) वयोमर्यादा. –**

**(क) किमान वयोमर्यादा :–** या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकास, अठरा वर्षे वय पूर्ण झालेले;

**(ख) कमाल वयोमर्यादा :–** या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकास, राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी अडतीस वर्षे वय पूर्ण झालेले आणि राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षे वय पूर्ण झालेले.

**(२) किमान शैक्षणिक अर्हता :–** यांत्रिकी (मॅकेनिकल) अभियांत्रिकी किंवा स्वयंचल (ऑटोमोबाईल) अभियांत्रिकी किंवा उत्पादन (प्रॉडक्शन) अभियांत्रिकी किंवा उत्पादन (प्रॉडक्शन) तंत्रज्ञान यामध्ये पदविका किंवा पदवी धारण केलेली व्यक्ती.

**४. विभागीय परीक्षेची तरतूद :–** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीस, जर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नसेल तर, त्या व्यक्तीने विहित कालावधीत किंवा संधीमध्ये ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल. जर ती व्यक्ती विहित कालावधीमध्ये किंवा संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाली नाही तर, ती व्यक्ती, उक्त परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात येईपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही आणि ती, तिची सेवाज्येष्ठता गमावील.

**५. हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा :–** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती व्यक्ती, शासनाने, त्याबाबतीत, वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, ती व्यक्ती, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**६. संगणक हाताळणी प्रमाणपत्र :–** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीने, अगोदरच संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण केलेले नसेल किंवा असे प्रमाणपत्र धारण करण्यापासून तिला सूट देण्यात आली नसेल तर, ती व्यक्ती, शासनाने, त्याबाबतीत वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील, अन्यथा, ती व्यक्ती, ते प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**७. लहान कुटुंबाचे घोषणापत्र :–** (१) नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शिफारस केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ याच्या तरतुदींनुसार किंवा शासनाने, याबाबत वेळोवेळी केलेले अन्य कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास, दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्तीपूर्वी किंवा त्यानंतर, जर तिला, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर नियमितपणे ठेवण्यासाठी अपात्र असेल.

**८. बदली संबंधातील तरतूद :–** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, राज्यस्तरावर ठेवण्यात आलेल्या सेवाज्येष्ठता सूचीनुसार, महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

**९. इतर आदेश / नियम लागू होणे :–** कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीपूर्वी किंवा त्यानंतर, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले कोणतेही नियम किंवा निर्णय यांमध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. संजय बेलसरे,**
शासनाचे सचिव (लाक्षेवि).

## WATER RESOURCES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 29th June 2026.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. RTR-1517/CR.250/EST(Tech).— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of **Junior Engineer (Mechanical), Group B (Non-Gazetted),** in the Engineering Service under the administrative control of the Water Resources Department of the Government of Maharashtra, namely :—

**1. Short title and commencement-** (1) These rules may be called the Junior Engineer (Mechanical), Group B (Non-Gazetted) in the Engineering Service under the administrative control of the Water Resources Department (Recruitment) Rules, 2026.

(2) These rules shall come into force on the date of publication of these rules in the Maharashtra *Official Gazette*.

**2. Definitions-** In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means the Minister of the Department who shall be the competent authority to appoint on the post of Junior Engineer (Mechanical), Group B (Non-Gazetted);

(*b*) "Degree" means a degree of any discipline of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*c*) "Department" means the Water Resources Department of the Government of Maharashtra;

(*d*) "Departmental Examination" means examination conducted by the Maharashtra Engineering Training Academy, Nashik in accordance with the Junior Engineer in the Water Resources Department Departmental Examination (for confirmation) Rules, 2024;

(*e*) "Diploma" means a diploma of a recognized institution;

(*f*) "Government" means Government of Maharashtra;

**3.** Appointment to the post of the Junior Engineer (Mechanical), Group B (Non-Gazetted) in the Engineering Service under the administrative control of the Water Resources Department shall be made by nomination from amongst the candidates recommended by the Maharashtra Public Service Commission on the basis of result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely:-

**(i) Age Limit-**

**(A) Lower Age Limit-** Eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the post.

**(B) Upper Age Limit-** Thirty-eight years of age completed for the persons not belonging to reserved category and forty-three years of age completed for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the post.

**(ii) Minimum Educational Qualification-** A person holding diploma or degree in Mechanical Engineering or Automobile Engineering or Production Engineering or Production Technology.

**4. Provision for Departmental Examination-** A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination, shall be required to pass the Departmental Examination, within the time limit or opportunities, unless he has been exempted from passing the same. If the person does not pass the Departmental Examination within the prescribed time limit or opportunities, then he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post and shall loose his seniority, until the person passes the said Examination.

**5. Hindi and Marathi Languages Examination-** A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post, until he passes those examinations.

**6. Certificate in Computer Operations-** A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he already possesses or has been exempted from possessing such certificate otherwise, he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post, until he possesses the same.

**7. Declaration of Small Family-** (1) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rule 3 shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in Government Service.

**8. Provision regarding transfers-** A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra, as the seniority list of the said post is maintained at State level.

**9. Applicability of other Orders/Rules-** The terms and conditions specified by the Government, in any rules, or resolutions issued by Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall also be applicable to the person appointed on the post mentioned in rule 3.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Dr. SANJAY BELSARE,
Secretary (CAD) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.